**मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे/औरंगाबाद व त्या अंतर्गत कार्यालयांसाठी स्वतंत्र आकृतिबंध निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
शासन निर्णय क्र.गुनिमं-२००६/(१४/२००६)/निवसं-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८/०६/२००८

**पहा :-** १) शासन निर्णय क्र.पाटबंधारे विभाग क्र.आढावा-१००२/(३३५/०२)/आ(प्रशि), दि.६/२/२००३.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.१७१/०६/१२, दि.१७/२/२००७.
३) मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांचे पत्र क्र.६/मुअ/कोप्र/आ-२/३२४८, दि.२४/१२/२००७.
४) मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांचे पत्र क्र मुअ/कोप्र/आ-२/(९९५)/२९१, दि.८/२/२००८

**प्रास्ताविक**

जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील विविध क्षेत्रिय कार्यालयांसाठी एकूण ४५,२९७ पदे मंजूर झालेली आहेत. व त्यानुसार सदर पदसंख्येच्या मर्यादेत जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील बांधकाम कार्यप्रकार, सिंचन कार्यप्रकार, यांत्रिकी संघटना, मेरी नाशिक व अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक या कार्यालयांकरिता सुधारित आकृतिबंध शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र.आढावा-१००२/(३३५/२००२)/आ(प्रशि), दि.६/२/२००३ अन्वये निश्चित करण्यांत आला आहे. सदर ४५,२९७ पदांच्या मर्यादेत राहूनच मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे/औरंगाबाद व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांच्या पदांचा आढावा घेण्यात आला असता गुणनियंत्रण कार्यप्रकारातील कामे वेगळया स्वरुपाची असल्याने त्यांची तुलना दि.६/२/२००३ च्या शासन निर्णयातील कार्याप्रकारामध्ये करता येत नाही, असे दिसून आले आहे. आणि त्यामुळे त्याकरिता कामाच्या आवश्यकतेनुसार स्वतंत्र आकृतिबंध लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>**

मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांच्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे व त्या अंतर्गत कार्यालयांसाठी एकूण ६३६ पदे व अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद व त्या अंतर्गत कार्यालयासाठी एकूण ५५३ पदे अशी एकूण ११८९ पदे मंजूर आहेत. आता स्वतंत्र आकृतिबंधानुसार अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे व त्या अंतर्गत ४ विभाग व २० उपविभागांसाठी एकूण ६२८ पदे व अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद व त्या अंतर्गत ४ विभाग व १७ उपविभागांसाठी एकूण ५५३ पदे अशी एकूण ११८१ पदे ही जलसंपदा विभागासाठी मंजूर असलेल्या ४५,२९७ पदांच्या मर्यादेत राहून मंजूर करण्यांत येत आहेत. मंजूर पदांच्या तपशीलाबाबतचे **प्रपत्र-अ** व **प्रपत्र-ब** सोबत जोडण्यात आले आहे.

२. सदर आकृतिबंधाच्या आढाव्या अंतर्गत अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे अंतर्गत १) गुणनियंत्रण उपविभाग, डिंभे २) गुणनियंत्रण उपविभाग, कराड ३) गुणनियंत्रण उपविभाग, आष्टा हे ३ उपविभाग बंद करण्यांत येत आहेत. तसेच अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद अंतर्गत १) गुणनियंत्रण उपविभाग क्र.१, मुदखेड २) गुणनियंत्रण उपविभाग क्र.३, नागपूर हे २ उपविभाग बंद करण्यांत येत आहेत. परिणामी दोन्ही मंडळांतर्गतची एकूण १६९ पदे कमी करण्यात येत असून १६१ पदांची वाढ होत आहे. मंजूर आकृतिबंधानुसार १६१ पदे अदलाबदलीने/फिरवाफिरवीने/ भरण्यास तसेच जलसंपदा विभागातंर्गत सद्या रिक्त असलेल्या पदावर/आकृतिबंधात मंजूर झालेल्या पदावर, बंद होणाऱ्या कार्यालयातील/आकृतिबंधामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या, अधिकारी/कर्मचारी यांचे समावेशन करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर स्वतंत्र आकृतिबंधानुसार आस्थापना मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी करावी.

४. जी पदे रिक्त असतील ती पदे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००६/प्र.क्र.१७१/०६/१२, दि.१७/२/२००७ अन्वये शीघ्रतेने भरण्याबाबत कार्यवाही करावी.

५. हा शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.आढावा-१००२/(३३५/२००२)/आ(प्रशि), दि.६/२/२००३ चा शासन निर्णयान्वये व वित्त विभागाच्या दि.२९/३/२००७ च्या अनौपचारिक संर्दभान्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६१८१७१९३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सहपत्र : प्रपत्र-अ व ब

रा.ना.जोशी

**( रा. ना. जोशी )**
शासनाचे अवर सचिव

प्रत :

खाजगी सचिव मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव मा.राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, मंत्रालय, मुंबई.
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, (लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व संबंधित कोषागार अधिकारी
सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे
मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे.
अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, पुणे / औरंगाबाद.
आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सह सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई.
जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंते/सह सचिव/उप सचिव,
जलसंपदा विभागाच्या तसेच महामंडळांच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी
सर्व अधिकारी व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

**शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र.गुनिमं-२००६/(१४/२००६)/निवसं-३,**

**दि. १८/०६/२००८ चे सहपत्र.**

## प्रपत्र-अ

## गुण नियंत्रण कार्यप्रकारातील कार्यालयांचा आकृतिबंध

## मंडळ / विभाग / उप विभागातील पदांचा आकृतीबंध दर्शविणारे प्रपत्र.

| अ.क्र. | पदनाम | मंडळ कार्यालयासाठी मंजूर आकृतीबंध | विभागीय कार्यालयासाठी मंजूर आकृतीबंध | उपविभागीय कार्यालयासाठी मंजूर आकृतीबंध |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | अधीक्षक अभियंता | १ | - | - |
| २ | उप अधीक्षक अभियंता | १ | - | - |
| ३ | कार्यकारी अभियंता | - | १ | - |
| ४ | उप अभियंता | १ | १ | १ |
| ५ | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२ | ४ | ५ | ६ |
| ६ | विभागीय लेखापाल | - | १ | - |
| ७ | सहाय्यक आरेखक | १ | - | - |
| ८ | अनुरेखक | १ | १ | - |
| ९ | अधीक्षक | १ | - | - |
| १० | प्रथम लिपीक | १ | १ | - |
| ११ | वरिष्ठ लिपीक | ३ | २ | १ |
| १२ | कनिष्ठ लिपीक | ३ | ३ | १ |
| १३ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | - | - |
| १४ | टंकलेखक | २ | २ | १ |
| १५ | सहाय्यक भांडारपाल | १ | १ | - |
| १६ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | - | - | ३ |
| १७ | प्रयोगशाळा सहाय्यक | - | - | ३ |
| १८ | वाहन चालक | १ | १ | १ |
| १९ | दप्तरी | १ | - | - |
| २० | नाईक | १ | १ | - |
| २१ | शिपाई | ३ | ४ | २ |
| २२ | चौकीदार | १ | १ | १ |
| २३ | प्रयोगशाळा परिचर | - | - | ५ |
| | **एकूण** | **२८** | **२५** | **२५** |

# प्रपत्र-ब

**मुख्य अभियंता, कोयना प्रकल्प, पुणे यांच्या अधिपत्याखालीलअधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद अंतर्गत आकृतिबंधानुसार मंडळ/विभाग/उपविभाग यासाठी मंजूर आकृतिबंध.**

| अ. क्र. | पदनाम | गुण नियंत्रण मंडळ, पुणे | | गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद | | एकूण मुळ मंजूर पदे | एकूण स्वतंत्र आकृतिबंधानुसार मंजूर पदे | मुळ मंजूर पदांमधील | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ मंजूर पदे | स्वतंत्र आकृतिबंधानुसार मंजूर पदे | मुळ मंजूर पदे | स्वतंत्र आकृतिबंधानुसार मंजूर पदे | | | घट | वाढ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | अधीक्षक अभियंता | १ | १ | १ | १ | २ | २ | ० | ० |
| २ | उप अधीक्षक अभियंता | १ | १ | ० | १ | १ | २ | ० | १ |
| ३ | कार्यकारी अभियंता | ४ | ४ | ४ | ४ | ८ | ८ | ० | ० |
| ४ | उप अभियंता | २९ | २५ | २४ | २२ | ५३ | ४७ | ६ | ० |
| ५ | सहा.अभि.श्रे-२/शा.अ./क.अ. | १४४ | १४४ | १२६ | १२६ | २७० | २७० | ० | ० |
| ६ | स्था. अभि. सहाय्यक | १९ | ६० | ९ | ५१ | २८ | १११ | ० | ८३ |
| ७ | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० |
| ८ | संशोधन सहाय्यक | ८ | ० | ३ | ० | ११ | ० | ११ | ० |
| ९ | विभागीय लेखापाल | ४ | ४ | ४ | ४ | ८ | ८ | ० | ० |
| १० | अधीक्षक | १ | १ | ० | १ | १ | २ | ० | १ |
| ११ | प्रथम लिपीक | ५ | ५ | ५ | ५ | १० | १० | ० | ० |
| १२ | वरिष्ठ लिपीक | ४४ | ३१ | ४१ | २८ | ८५ | ५९ | २६ | ० |
| १३ | कनिष्ठ लिपीक | ४५ | ३५ | ३७ | ३२ | ८२ | ६७ | १५ | ० |
| १४ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | १ | १ | १ | २ | २ | ० | ० |
| १५ | टंकलेखक | ३१ | ३० | २९ | २७ | ६० | ५७ | ३ | ० |
| १६ | संगणक | २ | ० | ७ | ० | ९ | ० | ९ | ० |
| १७ | मख्य आरेखक | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० |
| १८ | आरेखक | २ | ० | २ | ० | ४ | ० | ४ | ० |
| १९ | सहाय्यक आरेखक | ४ | १ | ४ | १ | ८ | २ | ६ | ० |
| २० | अनुरेखक | १९ | ५ | २० | ५ | ३९ | १० | २९ | ० |
| २१ | भांडारपाल | ४ | ० | ४ | ० | ८ | ० | ८ | ० |
| २२ | सहाय्यक भांडारपाल | ५ | ५ | ५ | ५ | १० | १० | ० | ० |
| २३ | भांडार लिपीक | २ | ० | २ | ० | ४ | ० | ४ | ० |
| २४ | प्रयोगशाळा सहाय्यक | ६२ | ६० | ४९ | ५१ | १११ | १११ | २ | २ |
| २५ | वाहन चालक | १५ | २५ | १३ | २२ | २८ | ४७ | ० | १९ |
| २६ | दप्तरी | ५ | १ | ४ | १ | ९ | २ | ७ | ० |
| २७ | नाईक | ५ | ५ | ५ | ५ | १० | १० | ० | ० |
| २८ | शिपाई | ७७ | ५९ | ६८ | ५३ | १४५ | ११२ | ३३ | ० |
| २९ | चौकीदार/ पहारेकरी | २६ | २५ | २३ | २२ | ४९ | ४७ | २ | ० |
| ३० | प्रयोगशाळा परिचर | ७० | १०० | ६० | ८५ | १३० | १८५ | ० | ५५ |
| ३१ | लघु टंकलेखक | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० |
| ३२ | उप आवेक्षक | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० |
| | **एकूण** | **६३६** | **६२८** | **५५३** | **५५३** | **११८९** | **११८१** | **१६९** | **१६१** |